# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच् डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९०३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९०३४१


संदर्भ : रासेयो/ ७७ /२०१४ दि. २४/०६/२०१४

प्रति
मा. प्राचार्य/संचालक
पुणे विद्यापीठ संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था
पुणे शहर

**विषय : महाविद्यालयीन मतदार नावनोंदणी बाबत...**

महोदय,

मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार पुणे विद्यापीठ, संलग्नित सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये नावनोंदणी करून घ्यावयाची आहे. त्याकरीता महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांनी ज्या विद्यार्थ्यांचे मतदान यादीत नाव समाविष्ठ नाही अशा विद्यार्थ्याकडून फॉर्म भरून महाविद्यालयामध्ये जमा करून घ्यावयाचे आहे. प्रत्येक तीन दिवसानंतर महाविद्यालयामार्फत भरलेले फॉर्म निवडणूक कार्यालय, पुणे यांच्याकडून तपासून, जमा करून घेण्यात येणार आहे. त्याकरीता फॉर्मसोबत विद्यार्थ्यांनी स्वत:चा फोटो, वयाचा व पत्त्याचा पुरावा जोडावयाचा आहे. विद्यार्थ्याने www.ceo.maharashtra.gov.in आणि www.eci.nic.in या संकेतस्थळावर आपल्या नावनोंदणीसंबधी खात्री करून घ्यावयाची आहे.

**तरी महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मतदार नावनोंदणी करीता सहकार्य करावे ही विनंती.**

**टीप : संबधित फॉर्म नं. ६ लिंक - www.ceo.maharashtra.gov.in/Downloads/FORM-6.pdf या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.**

कळावे,

आपला विश्वासू,

प्र.कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना